सामना मुंबई, गुरुवार, दि. १९ एप्रिल २००७ ७

## पडद्याआडून

संजय डहाळे

*मराठी* रंगभूमीवर एकपात्री प्रयोग या प्रकारावर गंभीरपणे कुणी बघितलेलं नाही. पु. ल. देशपांडे यांची 'बटाट्याची चाळ' किंवा सुषमा देशपांडे यांचा 'व्हय मी सावित्रीबाई', प्रा. लक्ष्मण देशपांडे यांचे 'वऱ्हाड निघालं लंडनला', सदानंद जोशी यांचे 'मी अत्रे बोलतोय', रंगनाथ कुलकर्णीकृत 'गरीब बिचारे पुरुष...' यापुढे काय? या प्रश्नाचे या क्षणाला तरी उत्तर देणं कठीण आहे. कणकवली नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने आता एकपात्रीकार एका व्यासपीठावर मार्गदर्शन, सल्ला, विचार देण्याचा प्रयत्न असतो. मूळ असलेल्या व्यवसायावर गप्पांचा, प्रसंगी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्याचा प्रयोग त्यात असतो. अर्थात एखाददुसरा अपवाद वगळता अन्य कार्यक्रमांना जरी चांगला गल्ला जमत नसला तरी त्यासोबत पुस्तकांची विक्री, अभ्यासवर्गाची नोंदणी, यंत्रे, तक्ते याचा धंदा - साथसोबत करीत असतो. असो. पण हा रंगमंचीय अविष्कार हा आता एकपात्री दालनात आहे आणि त्याला कुठलं लेबल लावायचं यावर विचार हा एकपात्रीकारांच्या होणाऱ्या सुसंवादात कुठेतरी करणे गरजेचं आहे. असो.

वास्तुशास्त्र विषयावर माहितीपर 'वास्तुरविराज' या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा नुकताच नाबाद प्रयोग



# वास्तुरविराज रंगमंचावर!

आणले जात आहेत. कुठेतरी त्यांची नोंद घेतली जात आहे; पण 'एकपात्री' हा नाट्यातील कला प्रकार गेल्या पंचविसेक वर्षांत तुरळक प्रयत्न सोडले तर तसा दुर्लक्षितच राहिला. हे सत्य नाकारून चालणार नाही.

पण वेगळ्या वाटेवरल्या एकपात्री मात्र फॉर्मात आहेत. त्यात 'राशीभविष्य', 'क्रिकेट', 'कामजीवन', 'संगीत', 'वास्तुशास्त्र', 'मानसतज्ज्ञांचा सल्ला' यांना चांगली मागणी आहे. या वाटेवर शरद उपाध्ये, द्वारकानाथ संझगिरी, संजय उपाध्ये, डॉ. नंदकुमार मलमुले, विवेक मेहेत्रे, अनिल थत्ते, कणकवलीकर, हेमंत जोशी ही मंडळी दिसतात. त्यात प्रशिक्षण, क्र. ५० पूर्ण केला. डॉ. रविराज अहिरराव यांची वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस नावाची संस्था असून वास्तूविषयक मार्गदर्शन त्यातून केले जाते. दोन अंकी आणि अडीच तासांचा हा डॉ. अहिरराव यांच्यासोबतचा संवाद वेगळ्याच विश्वात घेऊन जातो. खरं तर वास्तुशास्त्र हा विषय तसा गंभीर, अभ्यासाचा, पुराणापासूनचे त्याला संदर्भ आहेत. हिंदू संस्कृतीतही वास्तुशास्त्राला कमालीचे महत्त्व होते. अत्यंत सरळ व ओघवत्या शैलीत दिशांचे महत्त्व, त्यांचे अर्थ पुराणापासून असणारे दाखले यावर चांगलं भाष्य यात करण्यात येतं. मुख्य म्हणजे डॉ. अहिरराव हे थेट प्रेक्षकांशी सुसंवाद साधतात हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आणि यशही आहे. वास्तूत कुठलीही तोडफोड न करता सकारात्मक ऊर्जा कशीकाय निर्माण करता येईल याचेही मार्गदर्शन अनेक उदाहरणांच्या आधारे देण्यात येतात. रांगोळ्या, शंख, चक्र, कलश यामुळे नकारात्मक गोष्टी टाळता येतात. घरात येणारी ऊर्जा ही प्रभावी ठरते असेही यात सादरकर्ते सांगतात. रंगांचं महत्त्वही घरात, कार्यालयात मोठे आहे. त्यावरच पटणारं भाष्य यात आहे. सादरकर्ता एकमेव असून कुठेही कंटाळा येत नाही. कारण प्रत्येकाला वास्तुशास्त्राबद्दल हे कुतूहल असतंच.

पृथ्वी, आकाश, अग्नी, जल, वायू ही पंचमहाभूतं तत्त्व आणि अष्ट दिशा हे वास्तुशास्त्राचा प्रमुख आधार आहेत. त्याचं निर्माण व अंत कुणी करू शकत नाही. जगभरात ही तत्त्वं आहेत. ज्या तत्त्वाचा नेमका अर्थ जाणून वास्तूरचना केल्यास काही परिणाम हे निश्चितच होतात. वास्तुशास्त्र हे तसे सर्वसमावेशक आहे. हा विषय आत शिरावा तेवढा वाढतच जाणारा. दोन-अडीच तासांत खरं तर हा विषय न संपणारा. कारण हे शास्त्र आहे जे पुराणापासून चालत आलेलं. आज परदेशी वास्तुशास्त्राचा आधार घेणारी मंडळी वाढत आहेत त्याचे मार्गदर्शन करणारेही दुकाने मांडून बसले आहेत, पण हे शास्त्र महाभारत, रामायण काळापासून आपल्याकडे आहे याचा मात्र पद्धतशीर विसर पडलेला दिसतो. हिंदू धर्मशास्त्रात वास्तू, रंग, तोडगे, दिशा, योगायोग यावर विपूल सामुग्री उपलब्ध आहे. हे लक्षात ठेवण गरजेचं. असो तर 'वास्तुरविराज' या एकपात्री कार्यक्रमात वास्तूविषयक बरंच काही प्रामाणिकपणे मांडण्याचा, प्रसंगी सतर्क करण्याचा प्रयत्न डॉ. अहिरराव यांनी केलाय. तोच त्यांचा व्यवसाय असल्याने त्यात त्यांची हुकमत आहे.

हिंदू जीवनपद्धती ही संपूर्णपणे शास्त्राधिष्ठित आहे. आजचा शोध जरी नवा वाटला तरी तो धर्मशास्त्रात पूर्वीच मांडलेला आहे. जगाच्या पाठीवर हिंदुस्थान हा असा एकच देश आहे की ज्याच्याकडे सर्वच ज्ञानाधिष्ठित शास्त्रे उपलब्ध आहेत त्याचा पिढ्यान् पिढ्यांनी अनुभव घेतला. घरात सुख येणं हे जरी आपल्या हाती नसले तरी सुखी होण्यासाठी अनुरूप वातावरण निर्मिती करणं आपल्या हाती निश्चितच आहे.

मराठी रसिकांनी पन्नास प्रयोगांपर्यंत 'वास्तुशास्त्र' या विषयाला साथ दिली. यापुढेही अशा 'हटके' एकपात्री मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे प्रयोग होतील यात शंकाच नाही. जाता जाता एक सूचना - या प्रयोगाच्या सादरीकरणात नेपथ्य, संगीत, गाणी, प्रकाशयोजना याचा कल्पकतेने समावेश केला तर प्रयोग आणखीन देखणा होईल. शाळेचा वर्ग वाटणार नाही. डॉ. अहिरराव यांच्या या संशोधन व सादरीकरणामुळे रंगमंचावरलं एक दालन खुले झाले आहे. रसिकांची उत्स्फूर्त दादही त्याला मिळत आहे. ■